# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

नॅक समिती तर्फे अ दर्जा प्राप्त


| | | |
|---|---|---|
| ई.पी.ए.बी.एक्स. | :- | (०२४०) २४०३३९९ ते ४०० |
| कार्यालय दूरध्वनी | :- | (०२४०) २४०३१२३, २४०३१२२ |
| कुलसचिव (का). | :- | (०२४०) २४०३३३३ |
| कुलसचिव (नि). | :- | (०२४०) २४००२०३ |
| फॅक्स | :- | (०२४०) २४०३११३ / २४०३३३५ |
| तार | :- | बामुसिटी |
| Web Site | :- | www.bamu.ac.in |
| E-mail | :- | vc@bamu.ac.in |
| E-mail | :- | registrar@bamu.ac.in |

विद्यापीठ परिसर,
औरंगाबाद - ४३१ ००४
(महाराष्ट्र)


**संदर्भ क्रं.अभ्यासक्रम/ पी.जी./प्रवेश/२०१६-२०१७/** 2644 - 3058 **दि:१०/०६/२०१६**

## अत्यंत महत्वाचे

प्रति,

सर्व प्राचार्या/प्राचार्य/संचालक,

सर्व संलग्नित महाविद्यालये,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**विषय:- CBCS या प्रणालीच्या सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ च्या प्रवेशासाठी प्रवेश पूर्व परीक्षा घेणे बाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयानुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ साठी महाविद्यालयीन स्तरावरुन प्रवेश प्रक्रियेची जाहिरात करुन मान्यता असलेल्या अभ्यासक्रमासाठी सर्व पदव्युत्तर प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेशाबाबत महत्वाच्या सूचना खालील प्रमाणे देण्यात याव्यात.

### प्रवेशपूर्व परीक्षेसाठी (CET) सूचना

१. सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशपूर्व परीक्षा अनिवार्य असून खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून प्रवेशपूर्व परीक्षा नोंदणी शुल्क २००/- रुपये तर मागासवर्गातील विद्यार्थ्यांकडून १००/- रुपये आकारण्यात यावे.

२. महाविद्यालयीन पातळीवर आवश्यक माहिती असलेला प्रवेशपूर्व परीक्षेचा अर्ज तयार करण्यात यावा.

३. प्रवेशपूर्व परीक्षेसाठीचे अभ्यासक्रम व प्रवेशपूर्व परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक आपल्या महाविद्यालयामध्ये तयार करुन सर्व विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करुन देण्यात यावे व त्याची एक प्रत मा. संचालक महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांना माहितीस्तव सादर करावी.

४. प्रवेशपूर्व परीक्षेत (CET) उत्तीर्ण असलेल्याच विद्यार्थ्यांना सर्व पदव्युत्तर अभ्याक्रमास प्रवेश द्यावा.

५. शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ च्या प्रवेशीत विद्यार्थ्यांची अंतीम यादी प्रवेशपुर्व परिक्षेच्या निकालासह मा. संचालक महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांचे कडे माहितीस्तव व मान्यतेस्तव सादर करावी.

६. शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ साठी परिपत्रक क्रं.एस.यु. / शैक्षणिक दिनदर्शिका / २०१६-१७ / ८९ / २०१६ / ५००-९५० / दिनांक ०७-०५-२०१६ अन्वये परिपत्रित केलेल्या सत्र व सुट्टयांच्या दिनदर्शिके प्रमाणे सर्व शैक्षणिक उपक्रमाचे व प्रवेशाचे आयोजन करण्यात यावे.

**मा. संचालक,**
**महाविद्यालये व विद्यापीठ**
**विकास मंडळ.**

JK१००६२०१६/-*